जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक २१५ | शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER



## अहिल्यानगर–मनमाड रस्त्यावर भरधाव स्कॉर्पिओचा थरार

### चौघांना उडवले, दोघांची प्रकृती चिंताजनक

**अहिल्यानगर, ता. २७ :** काळ्या काचा आणि फॅन्सी नंबरप्लेट असलेल्या भरधाव स्कॉर्पिओने सावेडी नाक्याजवळ अक्षरशः मृत्यूचे तांडव घातले. सुसाट गाडीने तीन ते चारजणांना चिरडले. यातील एक तरुण तब्बल शंभर फुटांपर्यंत हवेत उडून रस्त्यावर आदळला. त्यानंतर स्कॉर्पिओ रस्त्याकडेला जाऊन धडकली. या घटनेत जखमी झालेल्या दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. घटनेनंतर चालक फरार होण्यात यशस्वी झाला आहे. दरम्यान, या घटनेनंतर शहरात कायद्याचा धाक उरला आहे की नाही, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

अहिल्यानगर-मनमाड हा प्रचंड वर्दळीचा महामार्ग आहे. गेल्या काही दिवसांपासून नगर पोलीस काळ्या काचा असलेल्या गाड्यांवर कारवाईचा देखावा करत आहेत; मात्र आजच्या घटनेने या कारवाईची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. आजच्या घटनेतील स्कॉर्पिओ सिद्धार्थनगर येथील विजू पठारे याच्या मालकीची असल्याचे समोर आले असून, या गाडीने सावेडी परिसरात धुमाकूळ घालत चौघांना उडविले. या भीषण धडकेनंतर स्कॉर्पिओ रस्त्याच्या कडेला जाऊन आदळली आणि तिचा पुढचा भाग पूर्णपणे निकामी झाला.

अपघातावेळी स्कॉर्पिओ मागे येणाऱ्या इतर गाड्याचीही एकमेकांना धडक बसल्याने महामार्गावर गोंधळ उडाला होता. प्रत्यक्षदर्शींनी मदतीसाठी धाव घेतली, तोपर्यंत चालक तेथून पसार झाला होता. अपघातात तीनजण गंभीर जखमी झाले असून, दोघांची प्रकृती चिंताजनक आहे. जखमींवर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. तोफखाना आणि वाहतूक पोलिसांनी तपास सुरू केली आहे.

# राज्याची अर्थव्यवस्था देशात अव्वल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### अर्थसंकल्पीय वृद्धी आणि गुंतवणुकीत महत्त्वाचा टप्पा

### तीन वर्षात एक लाख कोटी डॉलर्सची अर्थव्यवस्था करणार

**मुंबई, ता. २७ :** महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सध्या ५१ लाख कोटी रुपयांच्या पातळीवर पोहोचली असून देशातील सर्व राज्यांमध्ये सर्वाधिक स्थान मिळवले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करताना सांगितले की, सन २०२९-३० पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था निश्चितपणे १ लाख कोटी डॉलर्सच्या पातळीवर पोहोचेल आणि जगातील आर्थिक ताकद असलेल्या देशांच्या यादीत राज्याचा १३-१४ वा क्रमांक असेल.

सन २०१२-१३ मध्ये महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १३ लाख कोटी रुपयांवर होती. त्यानंतरच्या ११ वर्षांत तीन पट वाढून ती ५१ लाख कोटींवर पोहोचली आहे. याचा अर्थ असा की राज्याची आर्थिक वाढ दर वर्षी सुमारे १०-१२ टक्के दराने झाली आहे, जे भारतीय राज्यांच्या तुलनेत अत्यंत वेगवान दर आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या म्हणण्यानुसार, या वाढीच्या गतीला पाहता येत्या तीन-चार वर्षांत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ लाख कोटी डॉलर्सपर्यंत पोहोचेल, आणि जागतिक अर्थव्यवस्थांमध्ये भारतातील राज्य म्हणून महाराष्ट्राचा १३-१४ वा क्रमांक होईल.

याची पार्श्वभूमी अशी आहे की राज्य सरकारने विकसित महाराष्ट्र या धोरणाचा आराखडा जाहीर केला आहे. यामध्ये प्रगतिशील, शाश्वत, सर्वसमावेशक आणि सुशासनाधारित विकासावर भर देण्यात आला आहे. या आराखड्यानुसार जिल्हास्तरीय विकास आराखड्यात किमान २५ टक्के निधी खर्च करण्याची अट ठेवल्यामुळे प्रत्येक जिल्ह्याचा समावेशक विकास सुनिश्चित



होणार आहे. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्राने जागतिक पातळीवरील गुंतवणूकदारांचे लक्ष वेधले आहे. दावोस आर्थिक गुंतवणूक परिषदेत सरकारने केलेल्या करारांची अंमलबजावणी सुरू असून, सन २०२२-२५ दरम्यान झालेल्या बहुतेक सामंजस्य करार प्रत्यक्षात आणले गेले आहेत. यातील गेल्या वर्षीच्या करारांपैकी ८८ टक्के पूर्णत्वाला पोहचले आहेत. स्टार्टअप्सच्या बाबतीतही महाराष्ट्र देशाचा अग्रगण्य केंद्र बनला आहे. राज्यात थेट परकीय गुंतवणुकीपैकी ३९ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. ही आकडेवारी या गोष्टीची पुष्टी करते की महाराष्ट्रातील नवउद्योग, तंत्रज्ञान क्षेत्र आणि उद्योजकता महत्त्वपूर्ण स्तरावर प्रगत आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी रोजगार निर्मितीबाबतही ठोस आकडेवारी दिली. सरकारने ७५ हजार नोकऱ्यांच्या भरतीची घोषणा केली होती, परंतु आतापर्यंत १ लाख २० हजार ४४९ जणांना नोकऱ्या देण्यात आल्या आहेत. या आकड्यामुळे राज्यातील रोजगार वाढीचा वेग दिसून येतो, आणि पुढील काळात हा आकडा १.५ लाखांपर्यंत जाईल असे अनुमान आहे. नवीन भरतीसाठी लवकरच आणखी घोषणा होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

गडचिरोली जिल्ह्यात स्टील उत्पादनाचे केंद्र स्थापन करून सुमारे ७० हजार नवीन रोजगार उपलब्ध करून दिले जातील. या उद्योगामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, तसेच ग्रामीण भागातील लोकांसाठी रोजगाराच्या संधी वाढतील. राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीवर ठाम भूमिका घेतली आहे. यासाठी समिती गठीत करण्यात आली असून योग्य वेळी आणि योग्य शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळेल. याचा अर्थ असा की अत्यावश्यक गरज असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाईल आणि त्यांचे उत्पन्न स्थिर राहील. महाराष्ट्राची आर्थिक प्रगती केवळ राज्याच्या मर्यादित यशापुरती मर्यादित नाही. राज्यातील उद्योग, स्टार्टअप्स, सेवा क्षेत्र आणि शेती यातील प्रगती राष्ट्रीय जीडीपीला चालना देते. तसेच थेट परकीय गुंतवणूक आकर्षित होणे, रोजगार निर्मिती आणि सामाजिक विकासाचे संकेत देणे या अर्थाने हा आकडा महत्त्वाचा आहे.

> राज्याच्या आर्थिक वाढीची गती सातत्यपूर्ण असून, पुढील काही वर्षांत महाराष्ट्राच्या स्वप्नातील विकसित राज्याचे रूप साकार होईल. या विधानातून स्पष्ट होते की सरकारची धोरणात्मक दृष्टी स्पष्ट आहे. आर्थिक वृद्धी, गुंतवणूक, रोजगार निर्मिती आणि शाश्वत विकास यांचा संतुलित संगम साधणे हे उद्दिष्ट आहे.
> - **देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री

## राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका लवकरच होणार

**मुंबई, ता. २७ :** आरक्षणाच्या पेचामुळे २२ जिल्हा परिषदा आणि त्या अंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्या वगळता राज्यातील उर्वरित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नुकत्याच झाल्या आहेत. आता राज्यात ११ हजार ४१ सहकारी संस्थांच्या निवडणुका लवकरच होणार आहेत. ग्रामीण भागातील अर्थकारणाच्या दृष्टीने या निवडणुका महत्त्वाच्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे लांबणीवर पडलेल्या राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त अनिल कवडे यांनी दिले आहेत. आतापर्यंत जेवढी तयारी झाली आहे, तिथून पुढील तयारी तातडीने करावी. निवडणुकांची घोषणा लवकरच करायची असल्यामुळे नियोजन सुरू करा, अशा स्वरुपाच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यातील ११ हजार ४१ सहकारी संस्थांच्या निवडणुकांच्या निमित्ताने ग्रामीण भागातले राजकारण नव्याने ढवळून निघणार आहे. ज्या सहकारी संस्थांच्या निवडणुकांना उच्च किंवा सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे, अशा संस्था वगळून इतर सर्व संस्थांची निवडणूक प्रक्रिया ज्या टप्प्यावर थांबवण्यात आली होती, त्याच टप्प्यापासून ती पुन्हा सुरू केली जाईल. प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी याबाबतचे पत्रक जारी केले आहे.

'अ' आणि 'ब' वर्गातील ज्या सहकारी संस्थांचा निवडणूक कार्यक्रम पुढे ढकलला होता, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था समिती निवडणूक नियमांनुसार सुधारित कार्यक्रम तयार करून प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी पाठवायचा आहे. ज्या संस्थांवर सध्या प्रशासक किंवा प्रशासक मंडळ कार्यरत आहे, अशा संस्थांनाही आता निवडणूक प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे. दरम्यान, निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी प्राधिकरणाने महत्त्वाचे निकष लावले आहेत. ज्या संस्थांनी अद्याप प्रारूप मतदार याद्या सादर केलेल्या नाहीत, त्यांच्यासाठी १ फेब्रुवारी २०२६ हा अर्हता दिनांक निश्चित करण्यात आला आहे. हा अर्हता दिनांक पुढील ३ महिन्यांसाठी वैध असेल.

## रोहित पवारांनी घेतली फडणवीसांची व राज ठाकरे यांची भेट

**मुंबई, ता. २७ :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अजित पवार यांच्या विमान अपघाताची पारदर्शक चौकशी व्हावी, या मागणीसाठी आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. संबंधित विमान कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी करत रोहित पवारांनी या प्रकरणातील संशयास्पद बाबींकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले. मुख्यमंत्र्यांनी तांत्रिक अडचणी समजून घेऊन योग्य कार्यवाहीचे आश्वासन दिलेय. यासोबतच रोहित पवारांनी देवगिरी बंगला व विधानभवन परिसरात स्मारक उभारण्याची आणि बारामती विमानतळाला अजित पवारांचे नाव देण्याची मागणी केली. राज ठाकरे यांचीही भेट घेत त्यांनी या लढ्यासाठी पाठिंबा मिळवला आहे. सोमवारी पत्रकार परिषदेत ते अधिक खुलासे करणार आहेत. विमान अपघाताबाबत चौकशी आणि FIR दाखल करण्याची मागणी आमदार पवार यांनी केली आहे.

## पुणे ग्रामीण पोलीस दलात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**पुणे, ता. २७ :** पुणे ग्रामीण पोलीस दल यांच्या वतीने पोलीस मुख्यालय येथे मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला. मराठी भाषेच्या जतन, संवर्धन आणि प्रसाराचा संदेश देणारा हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. स्नेहल तावरे (संचालक, स्नेहवर्धन रिसर्च इन्स्टिट्यूट व स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे), डॉ. प्रकाश पंधारे (निवृत्त प्राचार्य), अविनाश हळबे, सु. ल. खुटवड (मराठी लेखक व पत्रकार) तसेच मिलिंद शिंत्रे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी भूषविले. यावेळी अपर पोलीस अधीक्षक रविंद्र चोपडे, उपविभागीय




पोलीस अधिकारी राजेंद्र मायने तसेच पुणे ग्रामीण पोलीस दलातील अधिकारी, अंमलदार आणि कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या प्रतिमेचे व ज्ञानेश्वरीचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले आणि कार्यक्रमाची सुरुवात झाली. २७ फेब्रुवारी हा दिवस ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. कुसुमाग्रजांनी आपल्या साहित्यकृतींमधून मराठी भाषेला अभिमानाची ओळख मिळवून दिली आणि सामाजिक जाणीवा जागृत केल्या.

मान्यवरांनी मार्गदर्शन करताना मराठी भाषेची उत्क्रांती, तिचा प्रचार-प्रसार आणि आधुनिक तंत्रज्ञानाशी असलेले नाते यावर सविस्तर भाष्य केले. आज मराठी भाषा केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून परदेशातही तिचे शिक्षण दिले जाते, याची माहिती देण्यात आली. मराठी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती आपल्या संस्कृतीची, इतिहासाची आणि अस्मितेची ओळख आहे, असे मत व्यक्त करण्यात आले.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज यांनी राज्यकारभारात फारसीऐवजी संस्कृत व स्थानिक मराठी शब्दांचा वापर रुजवून राज्यव्यवहार कोश मराठीत तयार केला आणि प्रशासनात मराठीची भक्कम पायाभरणी केली, याचा उल्लेख करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र मायने यांनी केले.

## तर भविष्यात मराठी भाषा गौरव दिन काय साजरा करणार? सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली खंत

**पुणे, ता. २७ :** कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र या पाच विभागात मिळून तब्बल २५५ मराठी शाळा बंद पडल्या आहेत, अशी कबुली खुद्द सरकारनेच लेखी उत्तरात विधान परिषदेत दिली. शासनाने २०२५मध्ये ६२० मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला असून ७० गावांत ना शाळा, ना पेन्सिल अशी परिस्थिती आहे.

आज जगभरात मराठी भाषा गौरव दिन साजरा होत आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी ट्विटरवर एक पोस्ट शेअर करत एक खंत व्यक्त केली आहे. जर मराठी शाळाच राहिल्या नाहीत तर आपण भविष्यात मराठी भाषा गौरव दिन काय साजरा करणार? अशी खंत त्यांनी या पोस्टमधून व्यक्त केली.

ज्ञानपीठ विजेते साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त



आज आपण मराठी भाषा गौरव दिन साजरा करीत आहोत. केंद्र सरकारने मराठीला अभिजात भाषा दर्जा बहाल केला, ही निश्चितच आनंदाची बाब आहे. दुसरीकडे मात्र राज्यातील मराठी माध्यमाच्या सुमारे २५५ शाळा बंद पडल्याची माहिती स्वतः मंत्री महोदयांनी विधिमंडळात दिली. पालकांचा कल इंग्रजी माध्यमाकडे वाढत असल्याने या शाळांवर ही स्थिती ओढावली. थोडक्यात मराठी भाषेतून आपल्या मुलांना शिक्षण घ्यावे की नको याबाबत पालक साशंक दिसतात.

आपल्या मातृभाषेच्या बाबतीत निर्माण झालेली ही परिस्थिती अतिशय चिंताजनक आहे. म्हणूनच मराठी शाळांची गुणवत्ता, शैक्षणिक दर्जा याबाबत नव्या दृष्टिकोनातून विचार करुन मराठी शाळा अधिक सक्षम करण्याची गरज अधोरेखित होत आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्यानंतर केंद्र सरकारने भाषेचा विकास आणि प्रसारासाठी निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. हा निधी उपलब्ध असेल, तर तो प्राधान्याने मराठी शाळांचे बळकटीकरण, आधुनिक सुविधा आणि गुणवत्तावृद्धीसाठी वापरणे आवश्यक आहे.

दरम्यान, भाषेचे जतन आणि संवर्धन याची खरी सुरुवात शाळांमधूनच होते. आणि जर मराठी शाळाच राहिल्या नाहीत तर आपण भविष्यात मराठी भाषा गौरव दिन काय साजरा करणार?, असे त्यांनी या पोस्टमध्ये म्हटले आहे.

## दौंडमधील तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी प्रत्येकी ५ कोटींचा निधी व 'ब' वर्ग दर्जा

### राहुल कुल यांच्या पाठपुराव्याला यश

**दौंड, ता. २७ :** दौंड मतदारसंघातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांचा कायापालट करण्यासाठी आणि भाविकांना उत्तम सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमदार राहुल कुल यांनी विधानसभेत केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. राहू येथील श्री शंभू महादेव मंदिर, कुसेगावचे भानोबा देवस्थान आणि नारायण बेट (देऊळगाव गाडा) या तीर्थक्षेत्रांना 'ब' वर्ग दर्जा देऊन त्यांच्या विकासासाठी प्रत्येकी ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन राज्य सरकारने दिले आहे.

विधानसभेत अर्धा तास चर्चे'च्या माध्यमातून आमदार राहुल कुल यांनी मतदारसंघातील तीर्थक्षेत्रांचा प्रश्न आक्रमकपणे मांडला. यावेळी त्यांनी केवळ या तीनच नव्हे, तर केडगावचे पद्मावती माता मंदिर, रोटीचे रोटमलनाथ मंदिर आणि राजेगावचे राजेश्वर मंदिर या देवस्थानांच्या विकासासाठीही तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

आमदार कुल यांच्या प्रश्नाला उत्तर देताना ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे सांगितले की, दौंडमधील या तीर्थक्षेत्रांचे महत्त्व मोठे असून भाविकांची संख्याही लक्षणीय आहे. राहू, कुसेगाव आणि नारायण बेट या देवस्थानांना 'ब' वर्ग



दर्जा देण्याबाबतच्या प्रस्तावातील त्रुटी जिल्हा परिषदेकडून तातडीने दूर केल्या जातील. या प्रत्येक देवस्थानाला बळकटी देण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी शासन देईल. याव्यतिरिक्त, नारायण बेट येथील वनक्षेत्रातील जागा आणि पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून मिळणारा भाविकांच्या संख्येचा दाखला यांसारख्या तांत्रिक बाबी तातडीने निकाली काढण्याचे निर्देशही प्रशासनाला देण्यात आले आहेत.

दरम्यान, आमदार राहुल कुल यांनी यावेळी दौंडमधील इतर 'क' वर्ग तीर्थक्षेत्रांनाही 'ब' वर्गात समाविष्ट करून घेण्याची मागणी लावून धरली. केडगाव, रोटी आणि राजेगाव येथील प्रस्तावांची पडताळणी करून निकषात बसणाऱ्या सर्व देवस्थानांना न्याय दिला जाईल, असे आश्वासनही यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडून देण्यात आले.

> मतदारसंघातील धार्मिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. केवळ दर्जा वाढवणे आमचे उद्दिष्ट नसून, त्या ठिकाणी येणाऱ्या लाखो भाविकांना रस्ते, पाणी आणि भक्तनिवास यांसारख्या सर्व पायाभूत सोयी-सुविधा मिळाव्यात यासाठी हा प्रयत्न आहे. सरकारने दिलेल्या प्रत्येकी कोटींच्या निधीमुळे या देवस्थानांच्या विकासाला मोठी गती मिळेल.
> - **राहुल कुल,** आमदार

## संक्षिप्त

### नगर रस्त्यावर बसच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**वाघोली, ता. २७ :** नगर रस्त्यावर भरधाव प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसच्या धडकेत दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी प्रवासी वाहतूक करणाऱ्या बस चालकाविरुद्ध वाघोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला. तुषार दत्तात्रय लोंढे (वय २२, रा. आनंदनगर, वाघोली) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वार तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी प्रवासी वाहतूक करणाऱ्या आराम बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत साई हरिभाऊ लोंढे (वय-२१, रा. आनंदनगर, वाघोली) याने फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दुचाकीस्वार तुषार लोंढे हा गुरुवारी (२६फेब्रुवारी) रात्री आठच्या सुमारास नगर रस्त्यावरुन निघाला होता. वाघोली परिसरात भरधाव प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसने दुचाकीस्वार तुषारला धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या तुषारला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान, पसार झालेल्या बस चालकाचा शोध घेण्यात येत असून, पोलीस उपनिरीक्षक थोरात तपास करत आहेत. नगर रस्ता भागात प्रवासी वाहतूक करणाऱ्या बसच्या धडकेत दुचाकीस्वार, तसेच पादचारी मृत्युमुखी पडण्याच्या घटना वाढल्या आहेत. बहुतांश अपघात बस चालकांच्या बेदरकारपणामुळे झाले आहेत.

### सिम कार्ड असेल तरच व्हाट्सॲप चालणार; एक मार्चपासून नवा नियम लागू होणार

**पुणे, ता. २७ :** सिम बाइंडिंगचे नियम लागू करण्याची २८ फेब्रुवारीची अंतिम मुदत वाढवण्यास केंद्र सरकारने नकार दिला आहे. त्यामुळे आता १ मार्चपासून पहृमध्ये सिम कार्ड असेल तरच व्हाट्सॲप चालेल अन्यथा ते चालणार नाही. नवीन नियमांनुसार पहृमध्ये सिम कार्ड नसल्यास व्हाट्सॲपसारखे मेसेजिंग ॲप काम करणार नाहीत. कॉम्प्युटरवर लॉगिन केलेले व्हाट्सॲपदेखील ६ तासांत लॉग-आऊट होईल. एखाद्या ॲपला सिम बाइंडिंगशी जोडता, तेव्हा ते ॲप तेव्हाच नव्या नियमानुसार, उघडेल जेव्हा तुमचे नोंदणीपृत सिम कार्ड त्याच पहृमध्ये असेल. सध्या नियमांचे पालन करण्याची मुदत वाढवण्यावर कोणताही विचार नाही, अशी माहिती केंद्रीय संचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी दिली. हे नियम राष्ट्रीय सुरक्षा आणि फसवणूक रोखण्यासाठी लागू करण्यात आले आहेत आणि सुरक्षेच्या मुद्द्यांवर सरकार कोणतीही तडजोड करणार नाही, असे सिंधिया यावेळी म्हणाले.

### ओढणीने गळा आवळून पत्नीचा खून

**पिंपरी, ता. २७ :** घरगुती कारणावरून ओढणीने गळा आवळून पत्नीचा खून केल्याची घटना निगडीतील ओटास्कीम परिसरात गुरुवारी (ता. २६) पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास उरुवेला घडली. गायत्री राठोड (३७) असे खून झालेल्या महिलेचे नाव आहे. या प्रकरणात साई मनोज राठोड (१६, निगडी) यांनी निगडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार मनोज बाळूभाई राठोड (४९, ओटास्कीम, निगडी) याला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मनोज राठोड याचे त्याची पत्नी गायत्री यांच्यासोबत घरगुती कारणावरून भांडण झाले. या वादातून आरोपीने गायत्री यांना हाताने मारहाण केली आणि फरशीवर पाडून त्यांच्या गळ्यातील ओढणीने जोरात गळा आवळला. या घटनेत गायत्री यांचा मृत्यू झाला. निगडी पोलीस तपास करत आहेत.

# भिगवणजवळ अपघातात तिघांचा मृत्यू मृतांमध्ये दोन वर्षांच्या मुलाचा समावेश

**भिगवण, ता. २७ :** पुणे-सोलापूर महामार्गावर भिगवण येथे डाळजजवळ टेम्पो आणि मोटारीच्या धडक्त झालेल्या अपघातात तिघांचा मृत्यू, तर तीनजण जखमी झाले. गुरुवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली.

आदिती अमर हातेकर (वय-२५), त्यांचा मुलगा जय (वय दोन वर्षे, रा. सांगोला) आणि सखुबाई ईश्वर गेजगे (वय ६०वर्षे, रा. सांगोला) अशी मृत्युमुखी पडलेल्यांची नावे आहेत. मोटारचालक चालक कबीरदास ईश्वर गेजगे (वय-५०), स्वाती कबीरदास गेजगे (वय-३४, रा. पाटस) आणि समृद्धी कबीरदास गेजगे (वय १०महिने, रा. पाटस) हे जखमी झाले आहेत.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोटार पुण्याकडे चालली होती. टायर पंक्चर झाल्याने टेम्पो महामार्गावर रस्त्याच्या कडेला उभा होता. टेम्पोला पाठीमागून मोटारीची धडक बसली. त्यामध्ये तिघे जागीच ठार, तर तीन जण जखमी झाले. टेम्पो हा महामार्गावरील पुलावर उभा होता. पुलाच्या पाठीमागे सोलापूरकडून पुण्याला जाताना तीव्र उतार आहे. या उतारावरून नेहमी वाहने वेगाने जात असतात. या अपघातात टेम्पोला मोटारीची पाठिमागून धडक बसल्याने मोटारीचा चक्काचूर झाला.

आजी-आजोबा व पणजी हे मुलीच्या घरी वाढदिवसासाठी गेले होते. वाढदिवसानिमित्त नातवाला विविध खेळणी भेट देण्यात आली होती. सर्वजण पाटसकडे परत निघाले असताना हा अपघात घडला.अपघात इतका भीषण होता की काही मृतदेह रस्त्यावर फेकले गेले. वाढदिवसानिमित्त मिळालेली खेळणी अपघातस्थळी विखुरलेली दिसत होती. छोटी खेळण्याची गाडी आयशरसमोर पडलेली पाहून मदतीसाठी धावलेल्या नागरिकांच्या डोळ्यात अश्रू आले.

दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच महामार्ग पोलीस, भिगवण पोलीस घटनास्थळी तातडीने दाखल झाले. जखमींना भिगवण येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघातामुळे काही काळ वाहतूक कोंडी झाली. सहाय्यक पोलीस निरीक्षक विनोद महांगडे तपास करत आहेत.

सुरक्षा उपायांची मागणी महामार्गावर पंक्चर किंवा अन्य कारणाने वाहने थांबवताना योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक असून, वाहनचालकांना लांबूनच सूचना मिळाव्यात यासाठी परावर्तक चिन्हे व इशारा दिवे लावणे बंधनकारक करावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. सदर अपघाताचा पुढील तपास भिगवण पोलीस करीत आहेत.

### संकटातही जो विनोद शोधतो तो खरा मराठी माणूस : एकनाथ शिंदे

**मुंबई, ता. २७ :** मराठी माणसाच्या रक्तातच विनोद आहे. विनोद हा समाजामध्ये माणूस जोडणारा पूल आहे. त्यामुळे संकटातही जो विनोद शोधतो, तोच खरा मराठी माणूस आहे, अशा शब्दात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठी माणसाचा गौरव केला.उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, आचार्य अत्रे आणि पु. ल. देशपांडे ही मराठी भाषेतील विनोदाची दोन शिखरे आहेत. त्यांच्या कर्तुत्वाची उंची हिमालयाएवढी आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून दिला आहे. त्यामुळे मराठी भाषा समृद्ध होण्यास मोठी मदत होणार आहे. मराठीचा वापर सर्व क्षेत्रात व्यवहाराची भाषा म्हणून केला पाहिजे. मराठीच्या समृद्धीची पताका सातासमुद्रापार आपल्याला फडकवत ठेवायची आहे. मराठी भाषेने मागील काळात बरेचसे बदल आत्मसात केले आहेत.

# कर्जमाफीचा निर्णय घेऊन सरकारने शेतकरी, साखर कारखान्यांना दिलासा द्यावा : बाळासाहेब थोरात

**अहिल्यानगर, ता. २७ :** महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योग सध्या गंभीर आव्हानांचा सामना करत असून, शेतकरी व कारखान्यांना दिलासा देण्यासाठी सरकारने तत्काळ कर्जमाफीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी केली. राज्याच्या अर्थकारणात सहकारी साखर कारखान्यांचा मोठा वाटा असून, या उद्योगाला सक्षम करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने ठोस भूमिका घ्यावी, असेही ते म्हणाले.

बाळासाहेब थोरात म्हणाले, यंदाचा गळीत हंगाम ११० दिवसांचा झाला असून, सुमारे ७लाख ६५ हजार हेक्टर क्षेत्रातील ऊस गळीतासाठी आला. मात्र, सततच्या पावसामुळे उसाचे नुकसान झाले व टन क्षमतेत घट झाली. अनेक कारखान्यांचा गळीत हंगाम अवघ्या ७४ दिवसांत आटोपला, तर पूर्वी १८० दिवसांपर्यंत हंगाम चालत असल्याची उदाहरणे आहेत. वाढती स्पर्धा, ऊस ओढून आणण्याची प्रवृत्ती आणि कमी रिकव्हरी, यामुळे आर्थिक ताण वाढल्याचे त्यांनी नमूद केले. कारखान्यांचे पुनर्गठन, अल्प व दीर्घ मुदतीच्या कर्जाचे पुनर्नियोजन आणि साखर उद्योगासाठी प्रोत्साहनपर योजना राबविणे अत्यावश्यक असल्याचेही थोरात यांनी सांगितले. अल्कोहोल व उपउत्पादनांमधून केंद्र व राज्य सरकारला हजारो कोटींचा महसूल मिळतो. जीएसटीमुळे अर्थचक्राला गती मिळत असली तरी कारखाने अडचणीत येत असतील, तर सरकारने त्यांना आधार देणे ही काळाची गरज आहे. निळवंडे धरणाचे पाणी प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचले पाहिजे. जिरायत व दुष्काळी भागांतील एकही शेतकरी कोरडा राहू नये, यासाठी सिंचन व्यवस्थेचे प्रभावी नियोजन आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, साखर संघटनेच्या बैठकीत जयंत पाटील व राजेश टोपे यांच्याशी राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर चर्चा झाल्याची माहिती त्यांनी दिली.




#### इथेनॉलचे उत्पादन वाढविणे राष्ट्रहिताचे

पेट्रोलमुळे जागतिक घडामोडींचा परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होत असून, ट्रम्प आणि रशियाचे पेट्रोलबाबतचे मत यावर हिंदुस्थानची होत असलेली ससेहोलपट परिणामकारक आहे. या पार्श्वभूमीवर पेट्रोलला पर्याय म्हणून इथेनॉल उत्पादन वाढविणे राष्ट्रहिताचे असून, यातून साखर उद्योगालाही बळ मिळेल, असा विश्वास बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला.

### पारपत्र कार्यालय बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलमुळे खळबळ

**पुणे, ता. २७ :** बाणेर येथील प्रादेशिक पारपत्र (पासपोर्ट) कार्यालयामध्ये बॉम्बस्फोट घडवून आणण्याची धमकी गुरुवारी सकाळी ईमेलद्वारे देण्यात आल्याने शहरात एकच खळबळ उडाली. या धमकीनंतर पोलिसांनी तातडीने पावले उचलत बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाद्वारे (बीडीडीएस) संपूर्ण परिसराची झाडाझडती घेतली. मात्र, तपासात कोणतीही संशयास्पद वस्तू मिळून आली नाही.

गुरुवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास पारपत्र कार्यालयाला एक ईमेल प्राप्त झाला. त्यामध्ये दोन व्यक्तींची नावे नमूद करून, त्यांना दुपारी एक वाजण्यापूर्वी कामावरून काढून टाकण्याची मागणी करण्यात आली होती. तसे न केल्यास कार्यालय बॉम्बने उडवून देण्याचा इशारा देण्यात आला होता.



धक्कादायक बाब म्हणजे, ई-मेलमध्ये उल्लेख असलेल्या नावाचे कर्मचारी त्या कार्यालयात कार्यरत नसल्याचे स्पष्ट झाले आहे. माहिती मिळताच पोलिसांनी संपूर्ण इमारत रिकामी करून तपासणी केली.

अखेर कोणतीही धोकादायक वस्तू न आढळल्याने प्रशासनाने सुटकेचा निःश्वास सोडला. सध्या पोलीस या अफवा पसरवणाऱ्या ईमेलचा तांत्रिक तपास करत आहेत. त्यानुसार संबंधितावर गुन्हा दखल केला जाणार असल्याची माहिती बाणेर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांनी दिली.

# पत्नीचा खून करून आत्महत्या भासवण्याचा प्रयत्न करणाऱ्या पतीला जन्मठेपेची शिक्षा

## बारामती न्यायालयाचा निर्णय

राहुलकुमार अवचट

यवत, ता. २७ : पत्नीचा गळा दाबून खून करून तो आत्महत्येसारखा भासवण्याचा प्रयत्न करणाऱ्या पतीला बारामती न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. गुरुवारी (ता. २६) झालेल्या सुनावणीत हा महत्त्वपूर्ण निकाल देण्यात आला.

मयुर गोरख गायकवाड (रा. ओम शक्तीछाया हॉस्पिटल समोर, यवत, ता. दौंड) असे जन्मठेपेची शिक्षा ठोठावलेल्या आरोपी पतीचे नाव आहे. तर पत्नी प्रमिला मयूर गायकवाड असे खून झालेल्या त्याच्या पत्नीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १८ जानेवारी २०१४ साली पत्नीच्या प्रमिला हिच्या चरित्रावर संशय घेऊन व माहेरहून पैसे आणण्याच्या कारणावरून आरोपी मयूर याने शिवीगाळ व दमटाटी करून हाताने गळा दाबून खून केला व पत्नीने स्वतः हून गळफास घेतला असा बनाव रचून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. या प्रकरणी अरुण रामदास जाधव यांच्या फिर्यादीवरून यवत पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला होता. तपास पूर्ण झाल्यानंतर खटला बारामती न्यायालयात चालविण्यात आला.

खटल्यादरम्यान एकूण सात साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. वैद्यकीय अधिकारी डॉ. रमेश चांदू जाधव यांनी आरोपीने हाताने गळा दाबून खून केल्याचे स्पष्ट मत व्यक्त केले. तसेच तपासी अधिकारी बी. एन. गावडे यांच्या साक्षीचा देखील न्यायालयाने विचार केला. फिर्यादी व इतर साक्षीदारांचे जबाब आणि सरकारी वकिलांनी मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने हा खून असल्याचे सिद्ध झाल्याचे नमूद केले.



बारामती न्यायालयाने आरोपी मयुर गोरख गायकवाड यास भा. द. वि. कलम ३०२ अंतर्गत सश्रम जन्मठेप व १० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली असून दंड न भरल्यास २ महिने साधी कैद तसेच पुरावा नष्ट केल्याने कलम २०१ अंतर्गत ७ वर्ष सश्रम कारावास व पाच हजार रुपये दंड शिक्षा सुनावली असून दंड न भरल्यास एक महिना सक्त मजुरी अशी शिक्षा ठोठावली आहे.

दरम्यान, या खटल्यात सरकारी वकील ॲड. ज्ञानदेव साहेबराव शिंगाडे यांनी प्रभावी बाजू मांडली. दौंड विभागीय पोलीस अधिकारी बापुराव दडस व पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कोर्ट अंमलदार तुकाराम ढोपरे व पैरवी अधिकारी गोरख कसपटे यांनी कामकाज पाहिले.

# राज्यातील शिवभोजन केंद्र चालकांना थकबाकी मिळणार; २०० कोटींची तरतूद

**मुंबई, ता. २७ :** राज्यातील शिवभोजन केंद्र चालकांना गेली सात महिने अनुदान मिळालेले नाही. कोविड काळात या योजनेमुळे अनेकांची भूक भागवता आली. त्यांचे थकलेले अनुदान दया, अशी मागणी शिवसेना ठाकरे पक्षाचे आमदार सुनील प्रभू पुरवणी मागण्यावर चर्चा करताना केली. पुरवणी मागण्यात या योजनेसाठी दोनशे कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पुरवणी मागण्या मान्य झाल्यानंतर या केंद्र चालकांचे गेली सात महिने थकलेले पैसे मिळणार आहेत.




राज्य सरकारच्या वतीने राज्यात १८०० शिवभोजन केंद्राचे वाटप करण्यात आले होते. राज्याची आर्थिक स्थिती डबघाईला आल्याने अनेक योजनांवर सरकार कात्री लावत आहे. शहरी भागातील गरीब कष्टकारी लोकांसाठी लाभदायक ठरणाऱ्या शिवभोजन योजनेसाठी सरकारकडून टप्याटप्याने अनुदान दिले जाते मात्र गेली सात महिने या केंद्र संचालकांना अनुदान मिळत नसल्याने केंद्र बंद पडण्याच्या मागार्वर आहेत. काही केंद्र संचालक व्याजाने पैसे काढून केंद्र चालवित आहेत.

सावकाराच्या विळख्यात हे केंद्र संचालक अडकले आहेत. त्यांना दिलासा देण्यासाठी त्यांचे अनुदान देण्यात यावे अशी मागणी प्रभू यांनी केली. या योजनेसाठी निधी मिळावी यासाठी अन्न नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निधी देण्याची मागणी केली. पुरवणी मागण्या मान्य झाल्यानंतर या संचालकांचे पैसे मिळतील असा आशावाद प्रभू यांनी विधानसभेत व्यक्त केला. यावेळी भुजबळ सभागृहात उपस्थित होते.

रोजगार योजनेसाठी केवळ ८० कोटी रुपयांची तरतूद केली जात आहे. या योजनेवर बोलताना सभागृहात नियोजन मंत्री उपस्थित नसल्याने प्रभू संतप्त झाले. सदस्य जनतेचे प्रश्न पोटतिडकीने मांडत असताना ऐकतोय कोण, लोकशाहीचा गळा घोटण्याचे काम सरकार करीत असल्याचा आरोप प्रभू यांनी केला. राज्यातील शहरी भागात पाळीव व भटक्या प्राण्यांसाठी प्रत्येक पालिका क्षेत्रात शववाहिनी व विद्युत वाहिनीची व्यवस्था करण्याची मागणी प्रभू यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुरवणी मागण्यांवर बोलताना केली.

# जोपर्यंत मविआतील तीन पक्ष एकत्र बसत नाही तोपर्यंत राज्यसभेचा तिढा सुटणार नाही

**मुंबई, ता. २७ :** महाराष्ट्रातील सात जागांसह राज्यसभेच्या ३७ रिक्त जागांसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार असून त्याच दिवशी निकाल जाहीर होणार आहे. या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून अद्याप कोणत्याही नाव जाहीर झालेले नाही. याबाबत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते, खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली असून जोपर्यंत महाविकास आघाडीतील तीन पक्ष एकत्र बसत नाही. तोपर्यंत तिढा सुटणार नाही, असे स्पष्ट मत त्यांनी सकाळी मुंबईत माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



संजय राऊत म्हणाले, जोपर्यंत मविआतील तीन पक्ष एकत्र बसत नाही तोपर्यंत तिढा सुटणार नाही. आज प्रत्येक जण आपापला पत्ता फेकत आहे, कुणी १०, कुणी १६, तर कुणी २० आमदारांच्या जोरावर यापैकी एकही पक्ष स्वतंत्रपणे सातवी जागा जिंकूशकत नाही हे सगळ्यांना माहिती आहे. पण राजकारणामध्ये अशी परिस्थिती निर्माण होते तेव्हा शेवटच्या क्षणापर्यंत रस्सीखेच होत असते. प्रत्येकाला वाटते आपल्या पक्षाचा माणूस जावा. या सगळ्यात शरद पवार वरिष्ठ आहेत, त्यामुळे त्यांच्या नावाची चर्चा जास्त होते.

राज्यसभेच्या एका जागेसाठी आत आता स्वाभाविक आहे की, काँग्रेस त्यांचे राजकारण करेल, शिवसेना आपला हक्क कायम ठेवेल. पण तिघांनी एकत्र बसून विधानपरिषद आणि राज्यसभेचा निर्णय घ्यावा लागेल. आमच्या पक्षामध्येही अनेक लोकांची इच्छा आहे. इच्छा व्यक्त करायला काहीच हरकत नाही. आमच्या पक्षामध्येही अनेक लोक सक्षम आहेत. पण योग्य व्यक्तीची निवड शिवसेनाप्रमुख करत होते आणि आता उद्धव ठाकरे करतात. तसे नसते तर संजय राऊत राज्यसभेवर कधी गेले नसते. बाळासाहेबांनी मला त्यावेळी पाठवले, असेही राऊत यावेळी म्हणाले.

# मराठीला ज्ञान भाषेत रूपांतरित करून पुढील पिढीपर्यंत नेऊया : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विधान भवनात जावे विनोदाच्या गावा विशेष कार्यक्रम

**मुंबई, ता. २७ :** जगामध्ये ज्ञानभाषा असलेल्या भाषांच पुढे प्रवाहित होत असल्याचा इतिहास आहे. ज्या भाषेतून व्यवहार चालतो, रोजगार मिळतो, ती भाषा प्रगतीचा भाव जागृत करते. त्यामुळे आपल्या अभिजात मराठी भाषेला ज्ञानभाषेत रूपांतरित करून समृद्ध अशी मराठी भाषा आपण पुढील पिढीपर्यंत नेऊया, असा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवनाच्या मध्यवर्ती सभागृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित जावे विनोदाच्या गावा या विशेष कार्यक्रमात व्यक्त केला.



कार्यक्रमास व्यासपीठावर विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, मराठी भाषा समिती प्रमुख आशुतोष काळे, विधिमंडळ सचिवालयाचे सचिव जितेंद्र भोळे उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांनी त्या काळात मराठी भाषा शुद्ध होण्यासाठी शब्दकोश तयार केला. त्यावेळी प्रशासन चालविताना मराठीवर फारशी, अरबी या भाषांचे आक्रमण होते. त्यामुळे मराठी भाषेचे शुद्धीकरण करण्याचे कार्य छत्रपती शिवाजी महाराज यांनी केले. मराठी भाषेचा अभिमान हा सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्यापासून सुरू होतो. सुरुवातीच्या काळातील आद्य ग्रंथांमधून आपली मराठी भाषा किती अभिजात आहे, हे आपल्याला पाहायला मिळते.

महाराष्ट्राच्या विधान मंडळात चालत असलेले कामकाज राजकीय क्षेत्र साहित्य निर्मिती करणारे आहे. या कामकाजामधूनच अनेक चित्रपट, नाट्य यांच्या कथानकांना विषय मिळत असतात. मराठीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अभिजात भाषेचा दर्जा देऊन राजाश्रय मिळवून दिला आहे. मराठी भाषा, आपल्या भाषेतील साहित्य आणि लोककला जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

# दौंड शहरात सलग दोन ठिकाणी चोरीच्या घटना; मंदिर व घरफोडी उघड




**दौंड, ता. २७ :** दौंड शहरात सलग दोन ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या आहेत. मंदिरातील दानपेटी फोडून रोख रक्कम लंपास करण्यात आली असून, दुसऱ्या घटनेत घरफोडी करून कपाटातील पैसे चोरून नेण्यात आले आहेत.

बुधवारी (ता. २५) रात्री आठ ते गुरुवारी (ता. २६) पहाटे सहा वाजण्याच्या सुमारास दौंड पाटस रोड येथील श्री १००८ चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिर येथे अज्ञात चोरट्यांनी चोरी केली. या प्रकरणी वैभव अशोक मडके (वय -३४, व्यवसाय -पेट्रोल पंप कर्मचारी, सध्या रा. श्री १००८ चंद्रप्रभु दिंगबर जैन मंदीर, दौंड -पाटस रोड ता. दौंड, जि पुणे. मुळ रा. वैराग ता. बार्शी, ता. सोलापूर) यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी मंदिराचा मुख्य लॉक उघडण्याचा प्रयत्न केला; मात्र तो न उघडल्याने संगमरवरी जाळी असलेल्या उघड्या खिडकीतून आत प्रवेश केला. मंदिरातील दानपेटीचे कुलूप तोडून त्यातील अंदाजे दोन ते अडीच हजार रुपये रोख रक्कम चोरी करून नेली. याप्रकरणी दौंड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या घटनेत दौंड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील शिवराज नगर परिसरात येथे घरफोडीची घटना घडली. रविवारी (ता. २२) सायंकाळी ५ ते बुधवारी (ता. २५) सायंकाळी सहा ते रात्री सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली. याप्रकरणी संतोष वसंत चंदुरकर (वय ५४, रा. दर्पण अपार्टमेंट औंध, पुणे मुळ रा. शिवराज नगर, दौंड, ता. दौंड) यांनी फिर्याद दिली. त्यानुसार अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोयंडा तोडून घरात प्रवेश केला. घरातील कपाटातून रोख रक्कम चोरी करून नेण्यात आली. याबाबत संतोष वसंत चंदुरकर (वय-५४) यांनी फिर्याद दिली आहे. दोन्ही प्रकरणां मध्ये अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

# राज्य सरकार एका FIR ला का घाबरत आहे?; रोहित पवार यांच्या भेटीनंतर राज ठाकरे यांचा सवाल



**मुंबई, ता. २७ :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी रोहित पवारांनी अपघात प्रकरणातील सर्व तांत्रिक बाबी समजावून सांगितल्याचे सांगितले. पत्रकार परिषदेत जे मुद्दे मांडले होते तेच त्यांनी प्रत्यक्ष भेटीतही सांगितल्याचे त्यांनी नमूद केले. राज ठाकरे म्हणाले की, रोहित पवारांनी तीन ठिकाणी एफआयआर नोंदवण्याचा प्रयत्न केला; मात्र तिन्ही ठिकाणी तो स्वीकारण्यात आला नाही. संबंधित पोलीस ठाण्यांना एफआयआर घेऊ नये, असे सांगितले गेले असल्याचा त्यांचा दावा आहे. त्यामुळेच संशय निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हटले.

ते म्हणाले, मरीन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात अधिकारी एफआयआर टाईप करत असताना तेथे डीसीपी आले आणि एफआयआर नोंदवू नये, असे सांगितले. हा प्रकार कशासाठी आहे? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. जर हा निव्वळ अपघात असेल आणि घातपात नसेल, तरी संबंधित कुटुंबीयांना शंका असल्यास किंवा चौकशी व्यवस्थित व्हावी म्हणून एफआयआर करायचा असल्यास त्यात अडथळे का आणले जात आहेत, असा सवाल त्यांनी केला.

सुनेत्रा पवार या उपमुख्यमंत्री म्हणून कार्यरत आहेत. त्या संबंधित व्यक्तीच्या पत्नी असल्याने त्यांनीही या बाबीकडे लक्ष द्यावे, असे राज ठाकरे यांनी म्हटले. सरकारकडून एफआयआर नोंदवू नका, असा दबाव येत असल्याचा आरोप त्यांनी केला. राज्यात कोणीही एफआयआर नोंदवू शकतो, असे सांगितले जाते; मात्र प्रत्यक्षात अडथळे आणले जात असतील तर त्यामागे काहीतरी कारण आहे का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. राज ठाकरे म्हणाले की, सरकारने याबाबत स्पष्ट उत्तर द्यावे. एफआयआर नोंदवण्यात काय अडचण आहे, हे सांगावे. तीन ठिकाणी प्रयत्न करूनही एफआयआर नोंदवला गेला नाही आणि पोलीस ठाण्यांवर दबाव टाकला जात असेल, तर हे का घडत आहे, हे स्पष्ट व्हावे.

सरकारकडून अधिकाऱ्यांना एफआयआर नोंदवू नका, असे सांगितले जात असेल तर अधिकाऱ्यांना दोष देता येणार नाही, असे ते म्हणाले. सध्या विधानसभा अधिवेशन सुरू असल्याने हा मुद्दा अधिवेशनात मांडावा. पुढे लोकसभेचे अधिवेशन सुरू झाल्यानंतर संबंधित खासदारांनीही हा प्रश्न उपस्थित करावा, असे त्यांनी सांगितले.

राज ठाकरे यांनी सांगितले की, सरकारी दबावामुळे एफआयआर नोंदवला जात नसेल, विशेषतः अजित पवारांसारख्या व्यक्तीच्या प्रकरणात, तर नेमके काय सुरू आहे, याचे उत्तर सरकारने द्यावे. एका महिन्याचा कालावधी होत आला असून प्राथमिक अहवालही सादर झालेला नाही, असे त्यांनी नमूद केले. त्यामुळे नागरिकांच्या मनात शंका निर्माण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# भीमाशंकर मंदिराच्या सभामंडपाची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये होणार



**पुणे, ता. २६ :** कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर परिसरात सुमारे २ हजार ७५० चौरस फुटांचा भव्य सभामंडप उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. विशेष म्हणजे हे काम केवळ ४ महिन्यांत पारंपरिक दगडी बांधकाम तंत्रज्ञानाचा वापर करून पूर्ण केले जाणार आहे. देशात पहिल्यांदाच पुरातत्त्व विभागामार्फत अशा स्वरूपाचा जीर्णोद्धार प्रकल्प राबवला जात असून, या दगडी बांधकामाची नोंद मध्ये व्हावी यासाठी जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला आहे.

खेड तालुक्यातील या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यास राज्य सरकारने यापूर्वी मान्यता दिली असून, एकूण २८८ कोटी १७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी केवळ सभामंडपासाठी १० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. पारंपरिक साहित्य, कौशल्यपूर्ण कारागिरी आणि कमी कालावधीत दर्जेदार काम पूर्ण करण्याचा हा प्रयत्न राष्ट्रीय स्तरावर आदर्श ठरेल, असा प्रशासनाचा विश्वास आहे.

सभामंडपात एकूण ४८ दगडी स्तंभ उभारले जाणार आहेत. प्रत्येक स्तंभ २ ते ३ दगडांमध्ये घडवला जाईल. स्तंभांवर कमानी बांधल्या जातील आणि त्या देखील ३ दगडांच्या साहाय्याने पूर्ण केल्या जातील. मध्यभागी भव्य घुमट उभारला जाणार असून, संपूर्ण रचना पारंपरिक पद्धतीने साकारली जाईल. आधुनिक यंत्रसामग्रीपेक्षा पारंपरिक तंत्रावर भर दिला जाणार आहे.

पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी सांगितले की, या कामाची गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद होणे हे केवळ पुणे जिल्ह्यासाठी नव्हे, तर संपूर्ण राज्य आणि देशासाठी अभिमानास्पद ठरेल. यासाठी लवकरच सल्लागाराची नेमणूक केली जाणार आहे. कुंभमेळ्याच्या निमित्ताने लाखो भाविक भीमाशंकर येथे येणार असल्याने हा सभामंडप धार्मिक आणि पर्यटनदृष्ट्या महत्त्वाची भर ठरणार आहे.

# हवेलीतील जमिनींच्या वादातून मिळणार सुटका; राज्य सरकारचा मोठा निर्णय




**पुणे, ता. २७ :** वाढते नागरीकरण, आयटी पार्क्स, रिंगरोडसारखी पायाभूत कामे आणि गुंतवणुकीची वाढती लाट यामुळे हवेली तालुक्यात जमिनींचे भाव अक्षरशः गगनाला भिडले आहेत. गेल्या काही वर्षांत शेतीजमीन, एनए प्लॉट, गृहनिर्माण प्रकल्प आणि औद्योगिक वापरासाठी मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री झाली. परिणामी सीमांकन, मोजणी, हक्कनिश्चिती आणि नोंद दुरुस्ती यांसारख्या कामांसाठी अर्जांची संख्या झपाट्याने वाढली आहे.

या वाढत्या ताणाचा सर्वाधिक परिणाम हवेली उपअधीक्षक, भूमिअभिलेख (मोजणी) कार्यालयावर झाला आहे. सध्या या कार्यालयाअंतर्गत तब्बल १४१ गावे येतात आणि दरवर्षी सुमारे ५ ते ६ हजार अर्ज दाखल होतात. इतक्या मोठ्या कार्यक्षेत्रामुळे प्रकरणे निकाली काढण्यास विलंब होत असून नागरिकांना महिनोन्महिने प्रतीक्षा करावी लागत आहे.

ही परिस्थिती लक्षात घेऊन भूमिअभिलेख विभागाने हवेली मोजणी कार्यालयाचे विभाजन करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. लवकरच यासंदर्भातील प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवला जाणार असून पुढील २ ते ३ महिन्यांत नवीन उपअधीक्षक कार्यालय कार्यरत होण्याची शक्यता आहे. नव्या कार्यालयामुळे १४१ गावांपैकी सुमारे निम्म्या गावांचा कारभार स्वतंत्रपणे हाताळला जाईल.

मोजणीनंतर क प्रत देणे, जमिनीच्या हक्कांबाबत सुनावण्या घेणे, सीमारेषा निश्चित करणे, वादग्रस्त प्रकरणांवर निर्णय देणे अशी जबाबदारी या कार्यालयावर असते. नवीन कार्यालयात १ उपअधीक्षक, शिरस्तेदार, भूकरमापक आणि इतर प्रशासकीय कर्मचारी नेमले जाणार आहेत. यापूर्वीही हवेली तहसील कार्यालयाचे विभाजन करून पिंपरी-चिंचवड आणि लोणी काळभोर येथे स्वतंत्र कार्यालये सुरू करण्यात आली होती. त्याच धर्तीवर हा निर्णय घेतला गेला आहे.

## हा बदल महत्त्वाचा का?

कारण जमीनविषयक वाद केवळ कायदेशीर प्रश्न नसून ते थेट गुंतवणूक, बांधकाम प्रकल्प आणि नागरिकांच्या मालकीहक्कांशी संबंधित असतात. जलद मोजणी आणि स्पष्ट नोंदीमुळे वाद कमी होतील, व्यवहारांना गती मिळेल आणि प्रशासनावरचा ताणही हलका होईल. हवेलीतील झपाट्याने वाढणाऱ्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय निर्णायक ठरणार आहे.






Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

# अरविंद केजरीवाल यांची मद्य धोरण घोटाळा प्रकरणात निर्दोष सुटका

**नवी दिल्ली, ता. २७ :** देशात प्रसिद्ध झालेल्या दिल्लीतील मद्य धोरण घोटाळ्या प्रकरणी मोठी बातमी समोर आली आहे. दिल्लीतील राऊस अव्हेन्यू न्यायालयाने दिल्ली दारू धोरणाशी संबंधित वादग्रस्त सीबीआय प्रकरणात आम आदमी पक्षाचे (आप) नेते अरविंद केजरीवाल यांनी निर्दोष मुक्तता झाली आहे.

या प्रकरणात मनीष सिसोदिया आणि विजय नायर यांना देखील सर्व आरोपांमधून निर्दोष मुक्त करण्यात आले आहे, ज्यामुळे केजरीवाल यांच्यासह सर्व नेत्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, सीबीआय आरोप सिद्ध करण्यात अपयशी ठरली आहे. या प्रकरणात कोणताही गुन्हेगारी कट किंवा विश्वासार्ह पुरावा आढळला नाही.

विशेष न्यायाधीश जितेंद्र सिंह यांनी या प्रकरणात हा आदेश दिला. न्यायालयाने म्हटले आहे की कोणताही एकूण कट किंवा गुन्हेगारी हेतू आढळला नाही. कोणत्याही पुराव्याशिवाय त्यांना गोवल्याबद्दल न्यायालयाने सीबीआयला फटकारले आणि नमूद केले की तपशीलवार आरोपपत्रात अनेक त्रुटी आहेत ज्या कोणत्याही साक्षीदारांनी किंवा विधानांनी समर्थित केल्या नाहीत.

न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले आहे की, मनीष सिसोदिया यांच्याविरुद्ध कोणताही प्रथमदर्शनी खटला तयार करण्यात आला नाही. न्यायाधीशांनी असेही म्हटले आहे

## मनीष सिसोदियांनाही दिलासा



की अरविंद केजरीवाल यांच्यावर कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय आरोप ठेवण्यात आले. न्यायालयाने सीबीआयच्या तपास पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत म्हटले आहे की, एजन्सी निष्पक्ष, तार्किक आणि निष्पक्ष तपास करण्यात अपयशी ठरली. जर तपास निष्पक्ष असेल तरच निष्पक्ष खटला शक्य आहे आणि या प्रकरणात, तपास अपूर्ण असल्याचे आढळून आले.

सिसोदिया यांना मोठा दिलासा राऊस अव्हेन्यू न्यायालयाने म्हटले की, सिसोदिया यांच्याविरुद्ध कोणतेही ठोस पुरावे सापडले नाहीत. सरकारी वकिलांना त्यांचा खटला सिद्ध करण्यात अपयश आले. न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले की, सीबीआयचे आरोप निराधार आहेत आणि कोणताही गुन्हेगारी कट रचल्याचे आढळले नाही.

केजरीवाल यांनाही क्लीन चिट केजरीवाल यांच्यावरील आरोपांना कोणताही आधार नसल्याचे न्यायालयाने म्हटले. कोणत्याही ठोस पुराव्याशिवाय त्यांना या प्रकरणात गोवण्यात आले.

## मोटारीचे सुटे भाग विक्री करणाऱ्या दुकानात चोरी

**पुणे, ता. २७ :** सजावटीसाठी लागणाऱ्या मोटारीचे सुटे भाग विक्री करणाऱ्या दुकानातून चोरट्यांनी पावणे चार लाख रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेल्याची घटना खराडी भागात घडली. याबाबत एका व्यावसायिकाने खराडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदाराचे खराडीतील आपले घर सोसायटी परिसरात सजावटीसाठी लागणाऱ्या मोटारीचे सुटे भाग (कार क्सेसरीज) विक्री करण्याचे दुकान आहे. चोरट्यांनी दुकानाचा पत्रा कापून आत प्रवेश केला. चोरट्यांनी पावणे चार लाख रुपयांचे सुटे भाग चोरून नेल्याची घटना नुकतीच घडली. पोलिसांनी दुकानातील सीसीटीव्ही चित्रीकरण ताब्यात घेतले असून, चोरट्यांचा शोध घेण्यात येत आहे. पोलीस उपनिरीक्षक राहुल कोळपे तपास करत आहेत.

**प्राईम लाईफ**



## महिनाभर दररोज गुळाचा चहा प्यायल्यास आपल्याला कोणते फायदे मिळतील

चहाचा फक्त उल्लेख केला की, चहा प्रेमींचा चेहरा खुलतो. हिंदुस्थानात चहाप्रेमींची संख्या ही सर्वाधिक आहे. त्यामुळेच सकाळपासून ते अगदी रात्री झोपायच्या आधीही चहा पिणारे इथे पाहायला मिळतात. पण तुम्हाला माहित आहे का, साखरेच्या चहाऐवजी गुळाचा चहा पिणे केवळ चविष्टच नाही तर आरोग्यदायी देखील आहे. गुळात अनेक पोषक घटक असतात. त्यात कॅल्शियम, फॉस्फरस, मॅग्नेशियम, पोटॅशियम, फॉलिक ॲसिड आणि लोह असे गुणधर्म असतात.

अधिक काळ निरोगी राहायचे असेल तर चहामध्ये गूळ घालायला सुरुवात करा. कारण गूळ खाणे हे रिफाइंड साखरेपेक्षा आरोग्यासाठी जास्त फायदेशीर आहे. खरं तर, गूळ अशुद्ध असतो. जास्त साखरेचे सेवन केल्याने विविध समस्या उद्भवू शकतात. तुम्ही थोडीशी चहाची पाने, लवंग, दालचिनी, तुळस, आले आणि गूळ पाण्यात मिसळून चहा बनवू शकता. दुधाच्या चहामध्ये गूळ घालणे हा एक आरोग्यदायी पर्याय असू शकतो. गुळाच्या चहामध्ये लोह, फायबर, पोटॅशियम आणि इतर पोषक तत्वे भरपूर असतात. ते रोगप्रतिकारक शक्ती वाढवते आणि निरोगी पचनाला प्रोत्साहन देते.

जर तुम्ही वजन कमी करण्याचा आहार घेत असाल, तर तुम्ही साखरेच्या चहाऐवजी गुळाचा वापर करू शकता.

मासिक पाळी दरम्यान गुळाचा चहा पिल्याने पोटदुखीपासून आराम मिळतो.


गुळाचा चहा पिल्याने मुरुमे टाळता येतात. आणि ब्लॅकहेड्सची समस्या कमी होते.

सर्दी, खोकला आणि फ्लू टाळण्यासाठी गुळाचा चहा पिणे अधिक हितकारक आहे.

कमकुवत प्रतिकारशक्ती मजबूत करायची असेल तर तुम्ही गुळाचा चहा सर्वात उत्तम पर्याय आहे.

# कुंजीरवाडी येथील यात्रेत ५ लाखांच्या दागिन्यांवर चोरट्यांचा डल्ला

**लोणी काळभोर, ता. २७ :** कुंजीरवाडी (ता. हवेली) येथील ग्रामदैवत भैरवनाथ व पिर देवाच्या वार्षिक यात्रेत गर्दीचा फायदा घेत दोन अज्ञात महिला चोरट्यांनी महिलांसह चिमुकल्यांच्या दागिन्यांवर डल्ला मारल्याची घटना बुधवारी (ता. २५) घडली आहे. महिला चोरट्यांनी १० हून अधिक नागरिकांचे अंदाजे ५ लाखांचे दागिने लंपास केले आहे. या घटनेमुळे कुंजीरवाडी सह परिसरात एकच खळबळ उडाली असून लोणी काळभोर पोलिस ठाण्यात दोन महिलांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



यात्रकरणी प्रिती विठ्ठल गोठे (वय २४,माळवाडी, कुंजीरवाडी, ता. हवेली) यांनी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रिती गोठे या त्यांच्या कुटुंबीयांसह २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सुमारे साडे पाच वाजण्याच्या सुमारास देवदर्शनासाठी यात्रेत गेल्या होत्या. सायंकाळी सुमारे ७ वाजण्याच्या सुमारास गर्दीतून मार्ग काढत असताना, त्यांच्या मागे अंदाजे ३० ते ३५ वर्षे वयाच्या दोन अनोळखी महिला जाणीवपूर्वक धक्काबुक्की करत असल्याचा त्यांना संशय आला.

प्रिती गोठे यांनी तत्काळ गर्दीतून बाहेर पडत तपासणी केली असता, त्यांच्या गळ्यातील सुमारे २० ग्रॅम वजनाचे, चालू बाजार भावाप्रमाणे ३ लाख रुपये किमतीचे सोन्याचे गंठण गायब असल्याचे लक्षात आले. याचवेळी प्रिती गोठे यांच्या कडेवर असलेल्या लहान मुलगा कृष्णा (वय १ वर्ष) याच्या गळ्यातील दीड ग्रॅम वजनाचा सुमारे २० हजार रुपये किमतीचा सोन्याचा बदामही चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले. या घटनेनंतर परिसरात शोधाशोध करण्यात आली असता, गावातील इतर महिलांनाही अशाच प्रकारे लुटल्याचे उघड झाले. सुजाता सतिष गाढवे यांचे सोन्याचे डोरले, आशा संतोष कांबळे यांचे पॅन्डल, प्रियांका जगधने यांच्या मुलाचे सोन्याचे बदाम, अनिता सुनिल शिंदे यांच्या नातवाचे कानातील बाळी व बदाम, तसेच शोभा युवराज चव्हाण यांच्या नातवाचे गळ्यातील बदाम अशा अनेक लहान-मोठ्या दागिन्यांवर चोरट्यांनी हात साफ केल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, आणखी तीन ते चार महिलांचे दागिनेही चोरीस गेल्याची माहिती आहे. याप्रकरणी दोन अज्ञात महिलांविरोधात लोणी काळभोर पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## लोणी काळभोर येथील आर्या हॉटेलवरील बेकायदेशीर दारू विक्रीचा पर्दाफाश

**लोणी काळभोर, ता. २७ :** आर्या हॉटेलवर खुलेआम सुरू असलेल्या बेकायदेशीर दारू विक्रीचा पर्दाफाश करण्यात लोणी काळभोर पोलिसांना यश आले आहे. पोलिसांनी मंगळवारी (ता. २४) रात्री पावणे दहा वाजण्याच्या सुमारास छापा टाकून हा प्रकार उघडकीस आणला. या छाप्यात पोलिसांनी देशी-विदेशी दारूचा २ हजार ५०० रुपयांचा साठा जप्त केला आहे. तर एकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अक्षय वामन जाधव (वय २५, रा. सिद्राममळा, लोणी काळभोर) याच्यावर महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ॲक्ट कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलीस अंमलदार सचिन भिमराव सोनवणे यांनी सरकारच्या वतीने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात





फिर्याद दिली आहे. अवैध दारू विक्री होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर पोलिसांनी छापा टाकला.

या छाप्यात रॉयल स्टॅग, क्लासिक गोल्ड, उर्बी स्पेशल, ओल्ड मंक रम, रॉयल चॅलेंज, मॅक्डोवेल्स, टँगो पंच देशी दारू तसेच बडवायझर व ट्युबर्ग बिअर जप्त करण्यात आल्या आहेत. संबंधित हॉटेल शेखर काळभोर यांच्या मालकीचे असून आरोपी अक्षय जाधव याने ते भाडेतत्त्वावर चालवित असल्याचे पोलिसांच्या चौकशीदरम्यान समोर आले.

## एकाचवेळी शहरातील नऊ गुंड तडीपार; पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांचे आदेश

**पुणे, ता. २७ :** शहरातील बिबवेवाडी, आंबेगाव आणि मार्केटयार्ड परिसरात दहशत माजविणाऱ्या नऊ गुंडाना दोन वर्षांसाठी शहर, तसेच जिल्ह्यातून तडीपार करण्याचे आदेश परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी दिले. एकाच वेळी नऊ जणांना तडीपार करण्यात आल्याने सराइतांना जरब बसली आहे.




जालिंदर मसा मोरे (वय ४८, रा. अप्पर इंदिरानगर), अण्णा ऊर्फ गणराज सुनिल ठाकर (वय २६, रा. अप्पर बिबवेवाडी), ओंकार लक्ष्मण सणस (वय -२३, रा. बिबवेवाडी), राजु महादेव डेंगळे (वय -२२, रा. सुखसागर नगर), आकाश गुलाबराव कांबळे (वय -२१, रा.), कृष्णा बबन लोखंडे (वय २४, रा.), आर्यन बापु बेलदरे (वय २४, रा. आंबेगाव बुद्रुक), सोमगौडा गुरन्ना चौधरी (वय -३३, रा. मार्केटयार्ड), साहिल भिमा अष्टगे (वय २०, रा. मार्केटयार्ड) अशी तडीपार करण्यात आलेल्यांची नावे आहेत. शहरात वाढती गुन्हेगारी आणि टोळीयुद्धाचा बिमोड करण्यासाटी पोलिसांनी कडक पावले उचललेली आहेत.

गुन्हेगारी टोळ्या, तसेच सराइतांच्या दहशतीमुळे नागरिक भयभीत झाले आहेत, तसेच कायदा आणि सुव्यवस्थेला बाधा निर्माण झाल्याने नऊ जणांना तडीपार करण्यात आले. आरोपींविरुद्ध खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, बेकायदा शस्त्र बाळगणे, गंभीर दुखापत करणे, धमकी देणे, मारहाण करणे असे गंभीर गुन्हे दाखल आहेत. वेळेवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करूनही त्यांच्या वर्तनात सुधारणा न झाल्याने आणि त्यांच्यामुळे समाजात भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने ही कारवाई केली आहे. पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली परिमंडळ दोनचे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते यांनी ही कारवाई केली.

## लोणी काळभोर येथे भररस्त्यात झोंबाझोंबी केल्याप्रकरणी चार जणांवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. २७ :** गर्दीच्या वेळी चार महिलांनी भररस्त्यात आरडाओरडा, शिवीगाळ आणि झोंबाझोंबी करत अक्षरशः धिंगाणा घातल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील दत्त मंदिर चौकात मंगळवारी (ता.२४) सायंकाळी सव्वा सात वाजण्याच्या सुमारास घडली आहे. या घटनेमुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. सार्वजनिक ठिकाणी शांतता भंग केल्याप्रकरणी चार जणांच्या विरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुनस अय्यु इराणी (वय ३५), सीमु मोसन इराणी (वय ५०),फातीमा मन्सुर जाफरीन (वय ५०) व फिजा ऊर्फ मम्माई मोहंमद जाफरीन (वय ३० सर्व रा. पठारे वस्ती, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे) अशी गुन्हा




दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी महिला पोलीस अंमलदार माधुरी केरबा चौधरी यांनी सरकारच्या वतीने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माधुरी चौधरी या २४ फेब्रुवारीला सकाळी ९ ते रात्री ९ या दिवसपाळीत ठाणे अंमलदार कक्षात फोन व वायरलेस ड्युटीवर होत्या. सायंकाळी सव्वासात वाजण्याच्या सुमारास दत्त मंदिर चौकाजवळ जोरजोरात आरडाओरडा होत असल्याची माहिती मिळताच, त्यांनी तत्काळ सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. तेव्हा चार महिला सार्वजनिक रस्त्यावर एकमेकींना शिवीगाळ करत झोंबाझोंबी करत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करून भांडणे सोडवली.

प्राथमिक चौकशीत घराजवळील वादातून हा प्रकार सुरू झाल्याचे समोर आले. तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्याकडे येत असतानाच रस्त्यावरच पुन्हा वाद उफाळून आला आणि भरचौकातच महिलांनी एकमेकींवर शिवीगाळ करत मारामारी सुरू केली. या प्रकारामुळे काही काळ वाहतूक खोळंबली तसेच परिसरात नागरिकांची गर्दी जमली. सार्वजनिक शांततेचा भंग केल्याप्रकरणी संबंधित चारही महिलांविरोधात भारतीय न्यायसंहिता कलम १९४(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कुंजीरवाडीत जुन्या वादातून तिघांवर जीवघेणा हल्ला

**लोणी काळभोर, ता. २७ :** कुंजीरवाडी (ता. हवेली) येथील यात्रेला गेलेल्या तरुणांवर जुन्या वादातून जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. ही घटना बुधवारी (ता. २५) रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. या मारहाणीत कमरेच्या बेल्टच्या लोखंडी हुकाने थेट डोक्यात मार लागल्याने एकजण गंभीर जखमी झाला आहे. लोणी काळभोर पोलिसांनी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

प्रविण राजुभाऊ घोडके (वय २१, मगरवस्ती, आळंदी म्हातोबाची, ता. हवेली) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर गौरव खलसे, आदेश बरडे (रा. कुंजीरवाडी, ता. हवेली) व एक अनोळखी इसम अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी प्रविण घोडके यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रविण घोडके व त्याचे मित्र ऋषिकेश लोंढे, अमर लोंढे व इतरांसह कुंजीरवाडी येथील यात्रा पाहण्यासाठी २५ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास गेले होते. ते सर्वजण रात्री ९ वाजता बाजार मैदान परिसरात घरी जाण्यासाठी थांबले असताना, अमर लोंढे याच्यासोबत पूर्वी भांडण झालेले गौरव खलसे, आदेश बरडे व त्यांचे इतर दोन साथीदार समोर उभे होते.

फिर्यादी प्रविण घोडके यांनी काय पाहता? अशी विचारणा करताच आरोपींनी शिवीगाळ सुरू केली आणि संतापाच्या भरात गौरव खलसे याने कमरेचा बेल्ट काढून त्यातील लोखंडी हुक प्रविण घोडके यांच्या डोक्यात मारला. या प्रहारात प्रविण घोडके जखमी झाले. त्यानंतर आरोपींनी तिघांनाही लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

दरम्यान, लोणी काळभोर पोलिसांनी घटनास्थळी तातडीने हस्तक्षेप करून सर्वांना पोलीस ठाण्यात आणले. जखमींना उपचारासाठी ससून रुग्णालयात पाठविण्यात आले.

उपचारानंतर प्रविण घोडके यांनी आरोपींच्या विरोधात तक्रार दिली आहे. त्यानुसार गौरव खलसे, आदेश बरडे व अनोळखी इसमाच्या विरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ११५(१), ११८(१), १३१, ३५२, ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# क्रिकेटपटू रिंकू सिंग यांच्या वडिलांचे निधन

**उत्तर प्रदेश, ता. २७ :** टी-२० विश्वचषकातील टीम इंडियाच्या महत्वाच्या खेळांडूपैकी एक असलेल्या रिंकूसिंह याच्या वडिलांचे निधन झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून खाचंद्र सिंह यांची प्रकृती खालावली होती. त्यामुळे त्यांना नोएडा येथील यथार्थ रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालावली आहे.



रिंकूसिंहचे वडील खाचंद्र सिंह हे स्टेज ४ यकृताच्या कर्करोगाशी झुंज देत होते. अखेर त्यांची कर्करोगाशी झुंज अपयशी ठरली आहे. खाचंद्र सिंह यांच्या निधनामुळे सिंह कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या बातमीमुळे रिंकूसिंह याच्या चाहत्यांना देखील मोठा धक्का बसला आहे. आता वडिलांच्या निधनानंतर रिंकूसिंग टी २० स्पर्धेत खेळणार की नाही? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. वडिलांच्या बिघडत्या प्रकृतीची माहिती मिळताच रिंकू सिंह याला अचानक टीम इंडिया सोडून घरी परतावे लागले. खाचंद्र सिंह अनेक दिवसांपासून मेकॅनिकल व्हेंटिलेटर सपोर्टवर होते आणि त्यांना सतत रेनल रिप्लेसमेंट थेरपी दिली जात होती. मंगळवारी टीम इंडियाने चेन्नईतील एमए चिदंबरम स्टेडियमम ध्ये सराव सत्र आयोजित केले होते, पण रिंकूसिंह सहभागी झाला नाही. त्यानंतर काही वेळातच त्याला वडील आजारी असल्याची बातमी समजली आणि तो त्याच्या घरी परतला.

ती भेट ठरली शेवटची रिंकू सिंह हा उत्तर प्रदेशातील अलिगडचा आहे. रिंकूने वडिलांना काही दिवसांपूर्वीच महागडी एक गाडी गिफ्ट दिली होती. २४ फेब्रुवारी रोजी रिंकूने वडिलांची भेट घेतली आणि त्याची ही भेट शेवटची ठरली. रिंकू अनेकदा त्याच्या मुलाखतीमध्ये वडिलांबद्दल बोलताना दिसला. त्याचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी घरोघरी सिलेंडर पोहोचवण्याचे काम रिंकू सिंहच्या वडिलांनी केले. अत्यंत कष्ट करून तो भारती क्रिकेट संघात दाखल झाला.

# दारू पिण्यास उसने पैसे न दिल्याने एकाच्या डोक्यात दगड घालून जीवे मारण्याची धमकी

## चार जणांवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. २७ :** दारू पिण्यासाठी उसने पैसे न दिल्याचा राग मनात धरून एका मेकॅनिक तरुणावर निर्घृण हल्ला केल्याची घटना घडली आहे. एवढेच नव्हे तर भांडण सोडवण्यासाठी धावून आलेल्या ६८वर्षीय वृद्ध आईलाही आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करत जीव मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ही घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील इंदिरानगर चौकात रविवारी (ता.२२) रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घडली आहे. लोणी काळभोर पोलीस ठाण्यात चार जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




आशिष उर्फ सोन्या रमेश झेंडे, विनोद झेंडेची आई (नाव अज्ञात), आतिश उर्फ गुड्या विनोद झेंडे आणि विनोद उर्फ बारक्या साहेबराव झेंडे (सर्व रा. इंदिरानगर, कदमवाकवस्ती, ता. हवेली) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी प्रदिप सुर्यकांत काळभोर (वय ३५, रा. इंदिरानगर, लोणी स्टेशन) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रदिप काळभोर हे २२ फेब्रुवारी रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास जेवणानंतर इंदिरानगर चौकात थांबले होते. त्यावेळी त्याच गल्लीत राहणारा आशिष उर्फ सोन्या रमेश झेंडे याने दारू पिण्यासाठी उसने पैसे मागितले. पैसे देण्यास नकार दिल्यानंतर त्याने शिवीगाळ करत थेट मारहाण सुरू केली. हा प्रकार पाहून भांडण सोडवण्यासाठी आलेल्या प्रदिप यांच्या वृद्ध आई प्रमिला काळभोर (वय ६८) यांनाही आरोपींनी लक्ष्य केले. त्याच वेळी विनोद झेंडेची आई (नाव अज्ञात), आतिश उर्फ गुड्या विनोद झेंडे आणि विनोद उर्फ बारक्या साहेबराव झेंडे हे देखील घटनास्थळी आले. चौघांनी मिळून प्रदिप आणि त्यांच्या आईला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

दरम्यान, या हल्ल्याची परिसीमा तेव्हा गाठली, जेव्हा आतिश उर्फ गुड्या झेंडे याने रस्त्यावर पडलेला दगड उचलून प्रदिप यांच्या डोक्यात मारला. या हल्ल्यात त्यांच्या डोक्याच्या मागील बाजूस गंभीर जखम झाली आहे. मारहाण करून परत आमच्या नादी लागलास तर जिवंत सोडणार नाही अशी उघड धमकी देत आरोपी तेथून पसार झाले.

या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात चारही आरोपींविरोधात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३५२, ३५१(३), ३५१(२), ११८(१), ११५(१), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंतु, या प्रकारामुळे कदमवाकवस्ती परिसरात संतापाची लाट उसळली असून दारूच्या नशेत उन्मत्त झालेल्या टोळक्यांकडून सर्वसामान्य नागरिकांवर होत असलेल्या दादागिरीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.